## नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक ३५/२०१८ मधील निशाण ४ वरील आदेश

**सिताराम गुरव व इतर १७............वादी**

**विरुध्द**

**राजाराम गुरव व इतर १३..........प्रतिवादी**

१. वादी यांनी हा अर्ज दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत मौजे कुर्णे, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथील सार्वजनिक शिमगोत्सव साजरा करणेमध्ये वादी यांना प्रतिवादी नं.१ ते १३ यांनी हरकत अडथळा करु नये अगर करवू नये, अशी प्रतिवादी नं.१ ते १३ यांना तूर्तातूर्त मनाई ताकीद होणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी नं.१ ते १३ यांनी निशाण ३० वर कैफियत, म्हणणे व प्रतिदावा सादर करुन वादी यांचे या अर्जातील कथने स्पष्ट शब्दांत नाकारली आहेत.

३. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे मौजे कुर्णे, ता.लांजा, जि. रत्नागिरी येथे श्री नवलाईदेवीचे पुरातन देवस्थान आहे. वादी नं.१ ते ३ हे एकाच घराण्यातील असून ते या देवस्थानचे वंशपरंपरेने पुजारी आहेत. वादी नं. ४ ते १७ हे या देवस्थानचे मानकरी आहेत. प्रतिवादी हे या देवस्थानचे कधीही पुजारी नव्हते व नाहीत. त्यांचे समाज मंदिर वेगळे असून त्यांची पूजा वेगळी असते. त्यांचे वाडीची होळी सुध्दा वेगळी असते. कवळ तोडण्यापूर्वी गावाचा म्हणून कौल घेण्याची प्रथा आहे. प्रतिवादी यांनी कित्येक वर्षे गावाच्या कौलाशी संबंध ठेवलेला नाही. प्रतिवादी हे कुर्णे गावचे ग्रामस्थ असल्याने शिमगोत्सवाच्या वेळी त्यांचे घरी पालखी नेली जाते. परंतु, त्यांचा सामान्य रयते पलीकडे काहीही संबंध नाही. गावामध्ये कोणाच्याही घरी पालखी नेल्यानंतर गावातील पुजारी या नात्याने वादी नं. १ ते ३ यांनी प्रथम पूजा करावयाची,अशी गावात पुरातन काळापासून प्रथा आहे. गुरवांनी पूजा केल्यानंतर यजमानांना पूजा करण्याची ईच्छा असल्यास त्यांनी पूजा करायला हरकत नसते. ही प्रथा गावातील लोक पुरातन काळापासून पाळत आले आहेत.

परंतु, सन २०१५ चे शिमगोत्सवापूर्वी प्रतिवादी यांचे घरी पालखी गेल्यानंतर त्यांनी वादी पुजा–यांनी पूजा करणेपूर्वी आपण प्रथम पूजा करणार, अशी पध्दत सुरू करण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादी यांनी ''गावानेच पालखी आमच्या घरी आणायची, मानकरी पण बरोबर पाहिजेत, पूजा आम्हीच करणार, तो आमचा हक्क आहे आणि गावाने पालखी घेऊन जावी,'' अशी हेकेखोर भूमिका गावासमोर घेतली व संपूर्ण गावाला वेठीला धरले. नवीन मनमानी पध्दत पाडण्यासाठी प्रतिवादी यांनी तहसिलदार, लांजा व पोलीस स्टेशनमध्ये खोटया व बिनबूडाच्या तक्रारी दिल्या आहेत. प्रतिवादी यांनी त्यांना गावाने वाळीत टाकल्याची खोटी तक्रारही दिली आहे. प्रतिवादी नं.१ ते १३ हे गावचे सार्वजनिक शिमगोत्सवास हरकत व अडथळा करणेची शक्यता आहे. त्यामुळे, प्रतिवादी नं.१ ते १३ यांचे विरुध्द तूर्तातूर्त मनाई ताकीद व्हावी व अर्ज मंजूर करणेत यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. प्रतिवादी नं.१ ते १३ यांनी निशाण ३० वर या अर्जास म्हणणे सादर करून कुर्णे गावामध्ये श्री नवलाई देवीचे देवस्थान आहे, ही बाब मान्य केली आहे. परंतु, वादी यांच्या अर्जातील इतर कथने स्पष्ट शब्दांत नाकारली आहेत. प्रतिवादी यांचे कथनांप्रमाणे वादी नं.१ ते ३ हे श्री नवलाई देवी या देवस्थानचे वंश परंपरेचे पुजारी नाहीत. प्रतिवादी नं.१ यांचे घराणे देवाची पूजाअर्चा करीत असत. त्यानंतर प्रतिवादी नं.२, ४, ५, ७, ८ हे पूजाअर्चा करीत असत. परंतु, घराण्यातील वैयक्तिक अडचणींमुळे प्रतिवादी नं.२ यांनी वादी नं.१ यांना गावात आणले व त्यांचेवर पुजारीपणाचे काम सोपविले. शिमग्यात देवस्थानची पालखी मानकरी व ग्रामस्थांसह सर्व वाड्यांत नेली जाते. गुरववाडी सोडून इतर वाडयांमध्ये पालखी जाते तेव्हा घरी पालखी आल्यावर पालखीची पूजा वादी नं.१ व २ करतात. फक्त गुरववाडीत पालखी गेल्यावर त्या त्या घरातील कर्ता पुरुष त्या पालखीची पूजा करतो व त्या घरची सुहासिनी ओटी भरते, अशी गावात परंपरा आहे. नवरात्र उत्सवात सर्व प्रतिवादी व गावकरी वर्गणी देतात. परंतु, त्याची पावती दिली जात नाही. वर्गणी घेणेसाठी धर्मादाय आयुक्त यांची परवानगी घेतली जात नाही. वादी नं.१३ त्याबाबतचा हिशोब गावाला देत नाहीत. होळीच्या उत्सवामध्ये होळी आणण्यापासून ती तोडण्यापर्यंत

प्रतिवादी त्यामध्ये सामील असतात. गावातील सर्व लोकांचे म्हणणे होते की, पालखी आल्यावर त्यांना पूजा करण्याचा हक्क असावा. परंतु, वादी नं.११ यांचा त्यास विरोध होता. वादींनी प्रतिवादी यांचेकडे शिमग्याची पालखी आणणे बंद केले आहे व गेली दोन वर्षे प्रतिवादी यांना उत्सवाचे निमंत्रण दिले जात नाही. प्रतिवादी यांनी तहसिलदार, लांजा व पोलीस ठाणे, लांजा यांचेकडे वेळोवेळी तक्रार करुनही वादी हे कोणतीही गोष्ट मानण्यास तयार नाहीत. वादी देवस्थानचा मनमाने कारभार करत आहेत. प्रतिवादी यांनी उत्सवाला केव्हाही हरकत घेतलेली नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती प्रतिवादी नं.१ ते १३ यांनी केली आहे.

५. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. वादीतर्फे विधीज्ञ श्री. श्री.व्ही.पी. ढवळे व प्रतिवादी नं.१ ते १३ तर्फे विधीज्ञ श्री.डी.ए.आठवले यांचा युक्तीवाद ऐकला.

६. अर्जातील व म्हणण्यातील परस्पर विरोधी कथने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील कारणमिमांसे सहित निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| **मुद्दे** | **निष्कर्ष.** |
|---|---|
| १. वादी यांना या कामी सकृत दर्शनी केस आहे, हे वादी शाबीत करतात काय ? | ................होय. |
| २. न्यायाचा तराजू वादी यांचे बाजूने आहे, हे वादी शाबीत करतात काय? | .................होय. |
| ३. तूर्तातूर्त मनाई आदेश न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे, हे वादी शाबीत करतात काय? | ..................होय. |
| ४. काय आदेश ? | ..................अर्ज मंजूर करणेत येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबतः–

७. हे तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची चर्चा एकत्रात करीत आहे.

८. मौजे कुर्णे, ता. लांजा, जि. रत्नागिरी या गावामध्ये श्री.नवलाईदेवीचे देवस्थान आहे व गावामध्ये दरवर्षी शिमगोत्सव केला जातो, याबाबत वाद नाही.

९ वादी यांचे कथनांप्रमाणे वादी नं.१ ते ३ हे श्री नवलाई देवी देवस्थानचे वंशपरंपरेने पुजारी आहेत. वादी नं. ४ ते १७ हे या देवस्थानचे मानकरी आहेत. या उलट, प्रतिवादी यांचे कथनांप्रमाणे प्रतिवादी नं.१ यांचे घराणे देवाची पूजाअर्चा करीत असत व त्यानंतर प्रतिवादी नं.२, ४,५,७ व ८ हे पूजाअर्चा करत असत. परंतु, घराण्यातील वैयक्तिक अडचणींमुळे प्रतिवादी नं.२ यांनी वादी नं.१ यांना गावात आणले व त्यांना पुजारीपणाचे काम सोपविले. वादी यांनी केलेल्या कथनांवरुन व प्रतिवादी यांनी काही अंशी मान्य केलेल्या कथनांवरुन वादी नं.१ ते ३ हे या श्री नवलाई देवी या देवस्थानची पूजाअर्चा करतात, असे सकृत दर्शनी दिसून येते. प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१,२,४,५,७ व ८ हे या देवीची पूजाअर्चा करीत होते, याबाबत प्रतिवादी यांचे कथनांव्यतिरिक्त कोणताही सकृतदर्शनी पुरावा दिसून येत नाही.

१०. वादी यांचे कथनांप्रमाणे शिमगोत्सवाच्या वेळी गावामध्ये कोणाच्याही घरी पालखी गेल्यानंतर वादी नं.१ ते ३ हे गावाचे पुजारी या नात्याने प्रथम पूजा करतात व त्यांनी पूजा केल्यानंतर यजमानांची पूजा करणेची इच्छा असलेस त्यांनी पूजा करायला हरकत नसते, अशी गावाची पुरातन काळापासून प्रथा आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये केलेल्या कथनांवरुन शिमग्यात देवस्थानची पालखी मानकरी व ग्रामस्थांसह सर्व वाडयांत नेली जाते, असे दिसून येते. परंतु, प्रतिवादी यांचे कथनांप्रमाणे गुरववाडी सोडून इतर वाडयांत पालखी जाते तेव्हा घरी पालखी आल्यावर पालखीची पूजा वादी नं.१ व २ करतात. फक्त गुरववाडीत पालखी गेल्यावर त्या त्या घरातील कर्ता पुरुष त्या पालखीची पूजा करतो व त्या घरची सुहासिनी ओटी भरते, अशी परंपरा गावात आहे. एखाद्याच्या घरी पालखी गेल्यानंतर सुहासिनी ओटी भरते, याबाबत उभय पक्षकारांमध्ये वाद नाही. प्रतिवादी यांनी केलेल्या कथनांवरुन सकृतदर्शनी दिसून येते की, गावामध्ये घरोघरी पालखी गेल्यानंतर त्या ठिकाणी पालखीची पूजा वादी नं.१ व २ करतात. प्रतिवादी यांनी

गुरववाडीत पालखी गेल्यावर त्या त्या घरातील कर्ता पुरुष पालखीची पूजा करतो, असे कथन केले आहे. परंतु, प्रतिवादी यांचे या कथनांस गावातील इतर लोकांची पुष्टी मिळत नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये गावातील फक्त त्यांचे गुरववाडीमध्ये देवस्थानचे पुजारी प्रथम पूजा न करता त्या त्या घरातील कर्ता पुरुष प्रथम पूजा करतो, अशी वेगळी प्रथा असल्याचे कथन केले आहे. गावामध्ये सर्व वाडयांमध्ये पालखी ग्रामस्थांच्या घरी गेल्यानंतर वादी पुजा–यांनी प्रथम पूजा करणेची मात्र गुरववाडीमध्ये त्या त्या घरातील कर्ता पुरुषांनी पूजा करायची प्रथा आहे, असे जे प्रतिवादी कथन करीत आहे ते कथन स्वाभाविक वाटत नाही. त्यामुळे, प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे ते नवलाई देवीचे पुजारी असल्याचे व त्यांचे कथनांप्रमाणे गुरववाडीमध्ये घरी पालखी आल्यानंतर त्या त्या घरातील कर्ता पुरुषाने पालखीची प्रथम पूजा करावयाची, अशी प्रथा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

११. वादी नं. १ ते १७ यांनी या कामी अनुक्रमे निशाण ५ ते २१ वर तूर्तातूर्त मनाई अर्जाचे पुष्टयर्थ त्यांची स्वतःची प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. वादी यांनी निशाण ३८ चे यादीसोबत कुर्णे गावातील २९ लोकांची प्रतिज्ञापत्रे त्यांचे अर्जातील कथनांचे पृष्टयर्थ सादर केली आहेत. ह्या सर्व प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन केले असता वादी नं.१ ते १७ व गावातील अन्य लोकांनी वादी कथन करतात त्याप्रमाणे कुर्णे गावातील शिमगोत्सवाची प्रथा असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी नं.१ ते १३ यांनी त्यांचे कथनांचे पुष्टयर्थ निशाण ४२ अनुक्रमांक १ व २ वर अनुक्रमे शांताराम कृष्णा गुरव व विश्वास भानू गुरव यांची प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. या दोन साक्षीदारांनी प्रतिवादी यांनी केलेल्या कथनांना पुष्टी दिली आहे. परंतु, वादी नं.१ ते १७ व गावातील अन्य २९ साक्षीदारांनी वादी यांचे कथनांचे पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. या बहुसंख्य साक्षीदारांनी शपथेवर केलेल्या कथनांवरुन विश्वास ठेवू नये, असा कोणताही सक्षम सकृतदर्शनी पुरावा अभिलेखात नाही. त्यामुळे, वर नमूद केलेल्या कथनांवरुन तसेच या प्रतिज्ञापत्रांवरून कुर्णे गावातील श्री नवलाई देवी देवस्थानचे वादी नं.१ ते ३ हे वंश परंपरेने पुजारी

असल्याचे, वादी नं. ४ ते १७ हे मानकरी असल्याचे आणि शिमगोत्सवामध्ये ग्रामस्थांच्या घरी पालखी गेल्यानंतर वादी नं.१ ते ३ या गावचे पुजा–यांनी पालखीची प्रथम पूजा करावयाची व ग्रामस्थ यजमानाला पूजा करावयाची असल्यास त्यांनी गावच्या पुजा–यांनी पूजा केल्यानंतर पूजा करायची, अशी गावामध्ये प्रथा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

१२. वादी व प्रतिवादी यांनी केलेल्या कथनांवरुन तसेच निशाण ४२, अनुक्रमांक ३ व ४ वर प्रतिवादी यांनी सादर केलेल्या अनुक्रमे पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, लांजा व तहसिलदार, लांजा यांचे कडील तक्रार अर्जावरून प्रतिवादी यांचे घरी पालखी गेल्यानंतर त्यांनी पालखीची प्रथम पूजा करण्याची प्रथा आहे. या प्रतिवादींचे मागणीवरुन सन २०१५ पासून वादी व प्रतिवादी तसेच ग्रामस्थांमध्ये शिमगोत्सवावरुन वाद असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. सन २०१९ सालातील शिमगोत्सव पुढील आठवडयात असून वादी कथन करतात त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ ते १३ यांच्या मागणीवरुन शिमगोत्सवामध्ये त्यांचे कडून हरकत अडथळा होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

१३. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.डी.ए.आठवले यांनी कथन केले की, या दाव्यास महाराष्ट्रपब्लिक ट्रस्ट ॲक्ट,१९५० चे कलम ५० मधील तरतूदींची बाधा येते. या उलट, वादी यांचे कथनांप्रमाणे या दाव्यास या तरतूदींची बाधा येत नाही. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. डी.ए.आठवले यांनी या कामी ***Kanbi Manji Abji and Ors. Vs. Kanbi Vaghi Mavji and Ors, 1993 Supp (4) Supreme Court Cases 351*** या न्यायनिर्णयाचा आधार घेतला. या न्यायनिर्णयामध्ये असे अधोरेखित केले आहे की, *“The plaintiffs in pith and substance were asking for alteration of the scheme of trust already settled. In any case, the right of the trustees to decide the place where devotees would recite the scriptures and also the place where the idols and portraits were to be installed had been questioned in the suit. The plaintiffs were indirectly trying to interfere with the management of the temple. Hence, the suit fell within the purview of Section 50 of the Bombay Public Trusts Act, 1950 and was barred by it.”*

या न्यायनिर्णयातील कथनांचे अवलोकन केले असता त्या कामी दोन पंथामध्ये वाद असल्याचे दिसते. त्या कामी वादी हे ट्रस्टच्या स्कीममध्ये व व्यवस्थापनामध्ये बदल करु पाहत होते. त्यामुळे, त्या कामी कलम ५० मधील तरतूदींची दाव्यास बाधा येते,असे अधोरेखित केले आहे. परंतु, या दाव्याचे कामी श्री नवलाई देवी देवस्थान हे विश्‍वस्त संस्था म्हणून नोंद आहे, असा सकृत दर्शनी पुरावा दिसून येत नाही. वादी यांनी या कामी शिमगोत्सवाच्या प्रथे व परंपरेबाबत प्रतिवादी यांचेकडून होत असलेल्या हरकतींबाबत मनाईची दाद मागितली आहे. त्या प्रकरणातील कथने व प्रस्तूत प्रकरणातील कथने भिन्न आहेत. त्यामुळे, हा न्यायनिर्णय प्रतिवादी यांना या कामी फारसा उपयोगी नाही.

१४. वादी यांनी त्यांचे कथनांचे पुष्टयर्थ खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.

***(1) Shree Datta Deostan Ttust Vs. Shri Milind Govind Kshirsagar, 2011(5) ALL MR 165,*** या न्यायनिर्णयामध्ये असे अधोरेखित केले आहे की, " *Plaintiff claiming his entitlement in respect of performance of Pooja, which is obviously his private civil right. In order to enquire into entitlement of the plaintiff to exercise his private civil rights, permission of the Charity Commissioner is not required."*

***(2) Mahomed Hassan Samru Vs. Peer Hazarath Diwanshah Dargah Trust, 2002(3) ALL MR 66,*** या न्यायनिर्णयामध्ये असे अधोरेखित केले आहे की, *“ Merely because the relief in the suit is for declaration or injunction, that per se would not attract the requirement of obtaining prior permission within the meaning of Section 50. ”*

***(3) Vinayaka Dev Idagunji Vs. Shivram & Sons., AIR 2005 SC 3081,*** या न्यायनिर्णयामध्ये असे अधोरेखित केले आहे की, *“ Section 50 of the Bombay Public Trusts Act is not attracted when the suit pertains to personal/private right of archaks (pujaris) and not to public right in a public trust. ”*

या न्याय निर्णयांचे एकत्रात अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीचे पूजा करण्याचे वैयक्तिक अधिकाराबाबत दावा असल्यास महाराष्ट्र पब्लिक ट्रस्टस् अॅक्ट, १९५० चे कलम ५० मधील तरतूदींची बाधा येत नाही. या

दाव्याचे कामी कुर्णे गावातील शिमगोत्सवाचे वेळी पालखी प्रत्येक ग्रामस्थाचे घरी गेल्यानंतर त्या ठिकाणी वादी नं.१ ते ३ यांचा पुजारी म्हणून प्रथम पूजा करण्याचा हक्क आहे, असे वादी यांचे कथन आहे. प्रतिवादी हे तो हक्क डावलत असल्यामुळे वादी यांनी हा निरंतर मनाई ताकिदीचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे, या दाव्यास कलम ५० मधील तरतूदींची बाधा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. प्रतिवादी यांनी दाव्यास महाराष्ट्र पब्लिक ट्रस्टस् ॲक्ट, १९५० चे कलम ५० मधील तरतूदींची बाधा येते, असा जो बचाव मांडला आहे, त्याबाबत दाव्याचे चौकशी कामी गुणदोषांवर उहापोह करणे योग्य होईल. त्यामुळे, हा मुद्दा गुणदोषांवरील चौकशीसाठी राखून ठेवून सद्यस्थितीमध्ये दाव्यास या तरतूदीची बाध येत नसल्याचे सकृत दर्शनी दिसून येत असल्याने या अर्जाचे चौकशीकामी त्याची बाधा येणार नाही.

१५. एकंदरीत उपलब्ध प्राथमिक पुरावा पाहता वादी कथन करतात त्याप्रमाणे कुर्णे, ता. लांजा, जि. रत्नागिरी या गावचे शिमगा उत्सवामध्ये पालखी प्रत्येक ग्रामस्थांचे घरी गेल्यानंतर वादी नं.१ ते ३ यांनी पुजारी म्हणून पूजा केल्यानंतर त्या ग्रामस्थ यजमानांची ईच्छा असल्यास त्यांनी त्यानंतर पूजा करायची, अशी प्रथा व परंपरा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. प्रतिवादी नं.१ ते १३ कथन करतात त्याप्रमाणे त्यांचे गुरववाडीमध्ये पालखी घरी आल्यानंतर त्या त्या घरातील कर्ता पुरुषाने प्रथम पूजा करावयाची, अशी प्रथा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. वादी यांना सकृत दर्शनी केस असल्याचे व न्यायाचा समतोल त्यांचे बाजूने असल्याचे वादी यांनी शाबीत केले आहे. प्रतिवादी नं.१ ते १३ यांचे विरुध्द तूर्तातूर्त मनाई आदेश न झालेस शिमगोत्सवाचे वेळी त्यांचेकडून हरकत अडथळा झालेस त्याचा गावाचे सामाजिक स्वास्थावर व संपूर्ण शिमगोत्सवावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येण्यासारखी नाही. त्यामुळे, वादी मागणी करतात त्याप्रमाणे वादी यांनी शिमगोत्सव साजरा करणेमध्ये प्रतिवादी नं.१ ते १३ यांनी दाव्याचा अंतिम निकालापावेतो हरकत अडथळा करू नये, अथवा करवू नये, अशी त्यांचे विरुध्द तूर्तातूर्त मनाई ताकीद होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे.

१६. प्रतिवादी नं.१ ते १३ हे कुर्णे गावातील ग्रामस्थ आहेत, याबाबत वाद नाही. वादी यांचे कथनांप्रमाणे प्रतिवादी हे ग्रामस्थ असल्याने त्यांचे घरी देखील श्री नवलाई देवीचे पालखी नेली जाते. वादी यांचे कथनांप्रमाणे प्रतिवादी यांचे घरी पालखी नेल्यानंतर वादी नं.१ ते ३ यांनी प्रथम पूजा केल्यानंतर प्रतिवादी यांनी त्यांचे त्यांचे घरी पालखीची पूजा करणेस त्यांची हरकत नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे, कुर्णे गावातील शिमगोत्सव साजरा करण्याच्या प्रथे व परंपरेस बाधा न आणता प्रतिवादी नं.१ ते १३ यांचा ग्रामस्थ म्हणून श्री नवलाई देवीचे दर्शन घेणेचा, शिमगोत्सवामध्ये व पालखी परिक्रमेमध्ये शांततेने सहभाग घेण्याचा आणि त्यांचे घरी पालखी आल्यानंतर गावचे पुजा–यांनी व मानक–यांनी प्रथा व परंपरेप्रमाणे त्यांची पूजा केल्यानंतर प्रतिवादी यांनी पालखीची पूजा करणेचा प्रतिवादी नं.१ ते १३ यांचा वैयक्तिक हक्क देखील अबाधित ठेवणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब, वरील कारणांचा विचार करता मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ बाबतः–**

१७ वर मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत केलेल्या विवेचनावरुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादी यांचा निशाण ४ वरील तूर्तातूर्त मनाई ताकीदीचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. दाव्याच्या अंतिम निकालापावेतो प्रतिवादी नं.१ ते १३ यांनी वादी कथन करतात त्याप्रमाणे मौजे कुर्णे, ता.लांजा, जि.रत्नागिरी येथील श्री नवलाई देवी देवस्थानचे प्रथे व परंपरेप्रमाणे वादी यांना शिमगोत्सव साजरा करण्यामध्ये हरकत अडथळा करु नये अगर करवू नये, अशी प्रतिवादी नं.१ ते १३ यांचे विरुध्द तूर्तातूर्त मनाई ताकीद करणेत येत आहे.

३. कुर्णे गावचा शिमगोत्सव साजरा करण्याच्या प्रथे व परंपरेस बाधा न आणता श्री नवलाई देवीचे दर्शन घेणेचा, शिमगोत्सव व पालखी परिक्रमेमध्ये शांततेने सहभाग

घेण्याचा आणि प्रतिवादी नं.१ ते १३ यांचे घरी पालखी आल्यानंतर गावचे प्रथे व परंपरेप्रमाणे पुजारी व मानकरी यांनी पूजा केल्यानंतर पालखीची पूजा करणेचा प्रतिवादी नं.१ ते १३ यांचा वैयक्तिक हक्क दाव्याचे अंतिम निकालापावेतो अबाधित ठेवणेत येत आहे.

४. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालाचे वेळी ठरविणेत येईल.

–

**दिनांक १५/०३/२०१९.** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण लांजा.** **दिवाणी न्यायाधीश क.स्त.,लांजा,**
**जि.रत्नागिरी.**

*Case No : RCS No 35 of 2018*
*I affirm that the contents of this pdf file Judgment are same words as per original Judgment,*
*Name of the Stenographer:Y.S.Lahute*
*Court Name: Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,*
*Date of decision :15/03/2019,*
*Judgment signed by P.O.on : 15/03/2019,*
*Judgment uploaded on :15/03/2019.*